# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** आष्टा **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0052 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/02/2022 21:21 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 22/02/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/02/2022
**Time From (वेळेपासून):** 12:12 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:12 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/02/2022 **Time (वेळ):** 20:54 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 017 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/02/2022 20:56 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तहसीलदार कार्यालय आष्टा येथील

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री.शरद जयसिंग पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लक्ष्मीवाडी,मिरज ग्रामीण ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | वर्तमान पता | लक्ष्मीवाडी,आरग जवळ,मिरज,मिरज ग्रामीण ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 3 | स्थायी पता | लक्ष्मीवाडी,आरग जवळ,मिरज,मिरज ग्रामीण ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9730818569**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाजीराव राजाराम पाटील | | | 1. शिराला, आशोकराज बंगला पो ठाणे , शिराळा,आष्टा,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुधीर दिपक तमायचे | | | 1. इंचलकरंजी,कोल्हापुर,आष्टा,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्कुवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

वर्दी जबाब ता.22.02.2022मी शरद जयसिंग पाटील वय 36 वर्ष व्यवसाय:- शेती रा.मु.लक्ष्मीवाडी पो.आरग ता.मिरज जि.सांगली मो.नं. 9730818569 मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. माझे मुळ गांव गोटखिंडी ता.वाळवा जि. सं○ागली या ठिकाणी माझी वडीलार्जीत शेतजमीन आहे. माझे पुर्वी नाव शरद जयसिंग वाघे असे होते. सन 2020 रोजी मी माझे आडनाव वाघे ऐवजी पाटील असे आडनावं बदल केल्याचे महाराष्ट्र शासन राजपत्र करून घेतले आहे.दि.28.12.2020 रोजी माझे मुळ गांव गोटखिंडी ता.वाळवा जि. सं○ागली या ठिकाणी असले वडीलार्जीत शेतजमीनीच्या सात बारा उतायावर राजपत्रानुसार नावात बदल करणेबाबतचा अर्ज अपर तहसिलदार कार्यालय आष्टा या ठिकाणी अर्ज केला असून सदर कामाबाबत चौकशी करण्यासाठी मी गेले वर्षभरापासून अपर तहसिलदार कार्यालय आष्टा या ठिकाणी हेलपाटे घालत आहे. परंतू अद्याप माझे काम पुर्ण झाले नाही.दि.11.02.2022 रोजी मी पुन्हा माझ्या कामासंदर्भात चौकशी करण्यासाठी अपर तहसिलदार कार्यालय आष्टा या ठिकाणी गेलो होतो. त्यावेळी मी लिपीक तमायचे यांची भेट घेवून माझ्या कामासंदर्भात चौकशी केली त्यावेळी लिपीक तमायचे यांनी माझ्या कामाच्या प्रकरणात नायबतहसिलदार पाटील यांची सही झाली नसल्याचे सांगीतलेने मी नायबतहसिलदार बाजीराव पाटील यांची भेट घेवून माझे राजपत्रानुसार नावात बदल करून देण्याचे काम करून देण्याबाबत विनंती केली त्यावेळी नायबतहसिलदार बाजीराव पाटील यांनी त्यांचे कार्यालयातील लिपीक तमायचे यांना बोलावून घेतले व त्यांचेशी माझ्या कामाबाबत चर्चा केली त्यावेळी बाजीराव पाटील यांनी मला माझ्या प्रकरणावर सही करतो परंतू 1000/- रूपये द्यावे लागतील दिल्याशिवाय काम होत नाही असे सांगीतले. त्यानंतर तमायचे यांनी देखील मला 1000/- रूपये घेवून या पाटील साहेब यांची सही घेवून तहसिलदार मडम यांचे समोर ठेवतो असे सांगीतले. मला नायब तहसिलदार पाटील व तमायचे लिपीक यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी तहसिलदार शंकरदास मडम यांची भेट घेवून माझे काम वर्षा पासून पेडींग असल्याचे सांगून काम करून देण्याबाबत विनंती केली. त्यावेळी तहसिलदार मडम यांनी पाटील साहेब व तमायचे यांना बोलावून घेवून माझे काम लवकरात लवकर समोर घेवून येण्याबाबत सांगीतले.त्यानंतर तहसिलदार मडम यांनी मला तुमचे काम लवकरात लवकर होईल



Scanned with CamScanner

असे सं◌ागीतले. मी तहसिलदार मडम यांचे कक्षामधून बाहेर आल्यानंतर पाटील नायब तहसिलदार यांनी मला तुझे काम माझ्या सही शिवाय पुढे जाणार नाही, तुझे प्रकरण निकाली काढतो, हेलपाटे मार त्याशिवाय तुला कळणार नाही अशी भिती घातली. त्यानंतर मी निघून आलो.श्री. बाजीराव पाटील नायबतहसिलदार व श्री.तमायचे हे माझ्याकडून 1000/- रूपये घेतल्याशिवाय माझे प्रकरण तहसिलदार मडम यांचे समोर ठेवणार नसल्याची माझी खात्री झाल्याने तसेच श्री.बाजीराव पाटील नायब तहसिलदार व श्री.तमायचे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि. 21.02.2022 रोजी अन्टी करप्शन ब्युरो सांगली या ठिक◌ाणी हजर राहून श्री. घाटगे पोलीस उप अधीक्षक अन्टी करप्शन ब्युरो सांगली यांची समक्ष भेट घेवून त्यांना माझ्या तक्रारीबाबत माहिती दिली. त्यावेळी घाटगे साहेबांनी दिले सूचनेप्रमाणे मी माझा तक्रारी अर्ज त्यांचे समक्ष हजर केला. त्यानंतर माझा तक्रारी अर्ज त्यांनी वाचून त्यावर सही केली. त्यानंतर घाटगे साहेब यांनी मला आष्टा येथील एसटी स्टँडजवळ हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी एसीबी कार्यालयातून निघून माझ्याकडील हिरो कंपनीची एम.एच.10 डी.के.1103 या मोटर सायकलीवरून रवाना होवून आष्टा एसटी स्टँडजवळ दाखल झालो.त्यानंतर घाटगे साहेब यांनी संपर्क केल्याप्रमाणे मी आष्टा एसटी स्टँडजवळ घाटगे साहेब थांबले ठिकाणी जावून त्यांची भेट घेतली. त्यावेळी घाटगे साहेब त्यांचे कडील शासकीय वाहनासह हजर होते. त्यावेळी घाटगे साहेब यं◌ानी त्यांचे सोबत आलेल्या दोन पंचाची ओळख करून दिली. तसेच त्यांचे पथकाचीही ओळख करून दिली. त्यानंतर घाटगे साहेबांनी दोन पंचा पैकी आतिक रफिक बलबंड यांनी पंच नं. 1 म्हणुन व संजय दिनकर कांबळे यांना पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवीले व माझा तक्रारी अर्ज पंचाना वाचणेस दिला. तो त्यांनी वाचून त्यावर सहया केल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्डर बाबत माहिती देवून डिजीटल व्हाईस रेकर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर घाटगे साहेब यांनी त्यानंतर घाटगे साहेब यांनी पडताळणी कामी मला व पंच बलबंड यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन तो माझेकडे दिला. तो मी माझे पन्टचे समोरील डावे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच बलबंड असे पायी चालत रवाना होवून एसटी स्टँडचे पाठीमागे असले अपर तहसिलदार कार्यालयात गेलो. त्या.ठिकाणी महसूल शाखेमध्ये लिपीक तमायचे हजर होते. मी त्यांना काम झाले का असे विचारले. त्यावेळी तमायचे त्यांचे कामामध्ये व्यस्त होते त्यांनी माझ्याकडे लक्ष दिले नाही. तमायचे यांचे समोर लोकांची गर्दी असल्याने मी व पंच बलबंड काही वेळ त्या ठिकाणी थांबून राहीलो. काही वेळा नंतर त्यावेळी तमायचे यांना मी कामाबाबत आठवण करून दिली. त्यावर तमायचे यांनी माझे काम आत असल्याचे सांगीतले. काही वेळा नंतर तमायचे यांचे समोर थांबलेल्या एका इसमाने त्यांना चहा बाबत विचारले असता तमायचे यांनी त्यांना घेवूया असे म्हणून त्यं◌ाचे जागेवरून उठून जावू लागले. मी व पंच देखील त्यं◌ाचे सोबत कार्यालयाच्या बाहेर आलो. आम्ही चालत चालत तमायचे यं◌ाचे सोबत जावू लागलो. त्यावेळी मी तमायचे यांना माझा कामाबाबत विचारले. त्यावर तमायचे यांनी मला आत सहीला ठेवले असल्याचे सांगून पैशाबाबत हाताने इशारा करून काय झाल त्याचे असे विचारले. त्यावर मी त्यांना पण किती ? असे विचारले. असता त्यांनी साहेबांशी बोलले पाहीजे असे म्हणाले. त्यावेळी त्यांचे सोबत असलेले इसमाने तमायचे यांना आपल्याकडून होत नाही का ? असे विचारले. त्यावर लिपीक तमायचे यांनी पाटील साहेब यांना उद्देशून शिवी देवून येवढा लांबून येतोय हा असे म्हणून माझ्याकडे इशारा केला. त्यावेळी आमचे सोबत असलेल्या इसमाने त्यांचे कामाला नऊ महिने झाले असल्याचे सं◌ागीतले. त्यावर तमायचे यांनी त्या इसमास मला उद्देशून हा माणूस अक्षरश: मिरजेतून येतोय असे म्हणून तमायचे यांनी मला कुठून येताय असे विचारले. त्यावर मी त्यांना मंगसूळी पासून येत असल्याचे सं◌ागीतले. त्यावर तमायचे यांनी त्या इसमास माझे प्रकरण 2020 चे असल्याचे सांगून माझे काम हरवल्यानंतर नवीन केल्याचे सं◌ागीतले. त्यानंतर तमायचे यांनी मला व आमचे सोबत असले इसमास बाजीराव पाटील 1000/- रूपये मागत असल्याचे सं◌ागीतले. त्यावेळी आमचे सोबत असलेल्या इसमाने पाटील साहेब यांना उद्देशून शिवी दिली. त्यावर मी तमायचे व त्या इसमास पाटील साहेब सरळ सरळ 1000/- रूपये मागत असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी पुन्हा तमायचे यांना मला कीती सांगीतले होते ? असे विचारले. त्यावर तमायचे यांनी मला हजार रूपये बोलले नाहीत का तुम्हाला, मग तुम्ही मडमकडे गेला. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना माझी ताकद तर बघा असे म्हणालो. त्यावर तमायचे यांनी मला त्याचे समोरच बोललोय बरोबर आहे का चुकीच असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पाटील साहेब यांना उद्देशून ऑफिसमध्ये समोरच बोलले असल्याचे सांगीतले. त्यावर आमचे सोबत असलेल्या अनोळखी इसमाने पाटील साहेब यांना उद्देशून शिवी देवून त्यांना कशाला तिथं बसवले आहे असे विचारले. त्यावर तमायचे म्हणाले ते पैसे दिले नाही तर काम निकाली काढतो अशी धमकी देतात असे म्हणाले. त्यावर मी त्यांना साहेबांचे नाव काय असे विचारले असता त्यांनी बाजीराव पाटील असे सं◌ागीतले. अशाप्रकारे आमचेत चर्चा सुरू असताना आम्ही पायी चालत स्टँड चौकातील एका हटेल मध्ये पोहचलो होतो. आमचेतील चर्चा सुरू असतानाच मी तमायचे यांना येतो असे म्हणून मी व पंच बलबंड त्या ठिकाणावरून निघून घाटगे साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो. घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर काढून त्यांचे ताब्यात दिला. त्यांनी तो बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी पंच बलबंड व मला पडताळणीची हकिगत विचारली असता आम्ही घडलेली सविस्तर हकिगत सांगीतली. त्यानंतर घाटगे साहेब, दोन्ही पंच व मी असे आम्ही मिळून डिजीट व्हाईस रेकर्डरमधील संभाषण ऐकले.त्यानंतर घाटगे साहेब यांनी लिपीक तमायचे व नायब तहसिलदार बाजीराव पाटील यांची पडताळणी करण्याचे निश्चित करून घाटगे साहेब यांनी मला व पंच बलबंड यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच बलबंड असे पायी चालत रवाना होवून एसटी स्टँडचे पाठीमागे असले अपर तहसिलदार कार्यालयात गेलो. त्या ठिकाणी तमायचे हजर होते. त्यांचे समोर गर्दी असल्याने मी व पंच बलबंड त्यांचे समोर थं◌ाबून राहीलो. काही वेळानंतर तमायचे यांनी मला संध्याकाळी सही होईल असे सं◌ागीतले. त्यावर मी तमायचे यांना साहेबांना भेटून रिक्वेस्ट करून काय असे म्हणालो. त्यावर तमायचे यांनी मला गडबड केली तर काम होणार नाही, काय बोलायचं नाही असे सांगीतले. त्यावर मी त्यांना सही कधी होईल ? असे विचारले. त्यावर त्यांनी सही होईल संध्याकाळी किंवा उद्या होईल असे म्हणाले. त्यावर मी त्यांना साहेबांना समजून सांगण्याबाबत विनंती केली. त्यानंतर तमायचे यांनी मला माझा मोबाईल क्रमांक मागीतला त्याप्रमाणे त्यांना मी दिला. त्यानंतर तमायचे यांनी मझ्याकडे पैशाबाबत हाताने इशारा करून त्यांचे समोरील वही टेबलवर उघडून ठेवली व यामध्ये ठेवा असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना कीती ? असे विचारून मला परफेक्ट सांगा, मला त्रास झाला आहे असे म्हणलो. त्यावर तमायचे यांनी एका कागदावर 1 असा आकडा लिहून दाखवून यात झिरो..झिरो..झिरो तेवढ करा असे म्हणाले. त्यावर मी त्यं◌ाना माझ्याकडे पाचशे सहाशे रूपये आहेत असे म्हणालो. त्यावर त्यांनी पुन्हा 1 असा आकडा दाखवून ठेवा यात असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पुन्हा किती ठेवू ? असे विचारून पाचशे का सहाशे असे विचारले. त्यावर त्यांनी त्यांचे एक बोट दाखवून 1000/- रूपयाबाबत खुनावले. त्यावर मी त्यांना माझा पगार कमी असल्याचे सांगून त्रास होत असल्याचे सांगीतले. त्यावर तमायचे यांनी मला संध्याकाळी घेवून जाणार का ?,डायरेक्ट व्हाट्सअप करतो, असे म्हणाले. त्यावर मी त्यांना साहेबांना भेटून येवू का असे विचारले. असता त्यांनी काय नाही बिंधास्त रहा असे म्हणाले. त्यावर मी त्यांना साहेबांनी 1000/- रूपये सांगीतले होते असे म्हणालो. त्यावर त्यांनी मला तुझी कंडीशन त्यांना सांगतो, तेवढात अडजेस्ट करायला सांगतो, तुम्ही फ्रंटला अजिबात जायच नाही असे म्हणाले. त्यावर मी त्यांना एटीएम मधून काढून आणून देत असल्याचे सं◌ागीतले. त्यावर तमायचे यांनी मला आदेश घेवूनच जा, फोन करतो असे म्हणाले. त्यावर मी त्यं◌ाना साहेबांच काय करून असे विचारले. त्यावर तमायचे यांनी मला तु काय आता जाऊ नकोस, तुझे पैसे वाचवलेत तेवढे बघ, घालवायचे असतील तर आत जा असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच बलबंड असे त्या ठिकाणावरून निघून पाटील साहेबांच्या



Scanned with CamScanner

कक्षा समोर गेलो. त्यावेळी पाटील साहेबांच्या समोर काही लोक बसलेले होते. नायब तहसिलदार पाटील यांनी माझ्याकडे बघून का आला आहे ? असे विचारले. त्यावर मी त्यांना कामा निमीत्त आलो असल्याचे सं○ागीतले. त्यावर पाटील यांनी त्यांचे कर्मचायास हाक मारून यांना काय पाहिजे विचारा दारा तोंडाला उभारू नका असे म्हणाले. त्यावर मी पाटील साहेबांना परवा येवून गेलो होतो असे म्हणालो. त्यावर पाटील साहेबांनी माझ्या कामाबाबत चर्चा करून त्या दिवशी सही केली असल्याचे सं○ागून तुम्ही घेवून गेला नाही का असे विचारून पाटील साहेबांनी तमायचे यांना बोलावून घेतले. काही वेळातच तमायचे पाटील साहेबांच्या कक्षात आले.(पुढील मजकुर स्वतंत्र पानावर सोबतजोडलेला आहे)

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Ajit Pandurang Sid(I (Inspector)) / 1000359APSM8001K **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Ajit Pandurang Sid
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 1000359APSM8001K

पोलीस स्टेशन ऑफीसर
आष्टा पोलीस **स्टेशन**



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner

त्यावर पाटील साहेबांनी तमायचे यांना "घे काय ते...देकी किती वेळ" असे म्हणून पाटील साहेबांनी मला जवळ बोलावून "काय विषय आहे एकदाच करून घ्या" असे म्हणाले.तसेच पाटील साहेबांनी तमायचे यंाना "काय असेल ते, करून घे की, काय रोज हेलपाटे घालायला, त्याच काय तरी नाव जुळत नाही काय झाल" असे म्हणाले. त्यावर तमायचे यांनी पाटील साहेबांना नाव चेंज करायच असल्याचे संागीतले. त्यानंतर पाटील साहेबांनी माझ्या कामा संदर्भात चर्चा करून तमायचे यांना " त्याच काय तरी घे, दे विषय" असे म्हणाले. त्यावर तमायचे यांनी पाटील साहेबांना "सही तर व्हायला पाहीजेकी, समोर जावू का सहीला" असे म्हणून तमायचे यांनी पाटील साहेबांना हाताने पैशाबाबत इशारा केला. त्यावर पाटील साहेबांनी तमायचे यांना " समोर जावू नको, इथं काय विषय हाय ते कर" असे म्हणून पैशाबाबत हाताने इशारा करून "जावून सांग तीथ आणि सही घे, विषय झाल्याशिवाय होत नाही माहीत नाही का तुला, घे काय असेल ते करून टाक" असे म्हणून पाटील साहेबांनी मला जाण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच बलबंड त्या ठिकाणावरून निघून घाटगे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यानंतर मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर घाटगे साहेब यांचे ताब्यात दिला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी पंच बलबंड व मला पडताळणीची हकिगत विचारली असता आम्ही घडलेली सविस्तर हकिगत सांगीतली.

त्यानंतर घाटगे साहेब, दोन्ही पंच व मी असे आम्ही मिळून डिजीट व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकले. एकंदरीत माझे राजपत्राप्रमाणे सातबारा उतायावरील आडनांव बदलण्याचे काम करून देण्यासाठी पाटील नायब तहसिलदार व लिपीक तमायचे यांनी माझ्याकडे 1000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. परंतू तमायचे यांनी काम झाल्यावर फोन करतो असे सांगीतले असल्याने घाटगे साहेब यांनी तमायचे यांचे कॉलची वाट बघण्याचे ठरवले. बराच वेळ वाट बघीतल्यानंतर घाटगे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझ्या मोबाईलवरून तमायचे यांना कॉल केला परंतू तमायचे यांनी कॉल कट केला. त्यानंतर घाटगे साहेब यांनी तमायचे यांचा निरोप आल्यानंतर तात्काळ कळवण्याबाबत तसेच दि.22.02.2022 रोजी सकाळी 11.00 वाजण्याचे सुमारास आष्ट¬ामध्ये हजर राहण्याच्या सुचना दिल्या.घाटगे साहेब यंानी दिले सुचनेप्रमाणे मी निघून गेलो.

आज दि.22.02.2022 रोजी 11.00 वाजण्याचे सुमारास घाटगे साहेब यांनी मला संपर्क करून आष्टा ते बागणी रोडवर येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी त्या ठिकाणी जावून घाटगे साहेब यांची भेट घेतली.

घाटगे साहेब यांनी पाटील, नायब तहसिलदार व तमायचे,लिपीक यांचे विरूध्द अपर तहसिलदार कार्यालय आष्टा येथे सापळा कारवाई आयोजीत करण्याचे निश्चित केले. घाटगे

Scanned with CamScanner

साहेबांनी मला लाच रक्कम 1000/- रुपये हजर करणेस सांगीतली. त्याप्रमाणे मी माझे शिल्लक रक्कमेतील 1000/-रुपये लाच रक्कम हजर केली. त्यावेळी सदर 1000/-रुपयाचे नोटांचे नंबर घाटगे साहेब यांनी एका कोया कागदावर पंचाचे समक्ष लिहून घेतले.

त्यानंतर घाटगे साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर घाटगे साहेब यांनी अॅंथ्रासिन पावडरचे उपयोग व गुणधर्म सांगीतले. त्यानंतर पोहेकॉ संकपाळ यांनी 1000/-रुपये रकमेच्या नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावून ती लाच रक्कम तमायचे यांना देणेसाठी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवली.

त्यानंतर घाटगे साहेबांनी मला दोन्ही पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या सुचना दिल्या. तसेच पोहेकॉ संकपाळ यांना जागीच थांबण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. त्यानंतर मी व पंच बलबंड असे माझ्या मोटर साकलीवरून रवाना होवून अपर तहसिलदार कार्यालयाच्या समोर जावून माझी मोटर सायकल पार्क केली. त्यानंतर मी व पंच बलबंड असे पायी चालत अपर तहसिलदार कार्यालयात गेलो. महसुल शाखेमध्ये तमायचे त्यांचे टेबल समोर हजर होते. तमायचे यांनी मला बघून दोन मिनीटे थांबण्यास सांगीतले. त्यांनतर काही वेळानंतर तमायचे यांनी मला दहा मिनीट थांबण्यास सांगीतले. काही वेळानंतर तमायचे यांनी मला काम झाले असल्याचे सांगून फोन करतो असे सांगीतले. काही वेळ आमचेत आवांतर चर्चा झाल्यांनतर तमायचे यांनी मला "मी फोन केल्यानंतर लगेच यायचे,सही करायची आहे,गडबड करू नको, सहीला आत ठेवले आहे, सही होवून येवू दे, डारेक्ट आदेशच घेवून जा." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना साहेबांना भेटण्याबाबत विचारले असता तमायचे यंानी मला "भेटा जावा, मला माहीत आहे,पैसे घेतल्याशिवाय कामच करणार नाही, थांबा जरा सही होत्या, आत्ता ठेवून गेला तर" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना मला थांबता येणार नसल्याचे संागीतले. त्यावर तमायचे यांनी मला साहेबांना भेटणार असेल तर पाच वाजेपर्यंत थांबा असे म्हणाले. त्यावर मी त्यांना मला गावाकडे जायचे असल्याचे संागीतले. त्यावर तमायचे यांनी त्यांचे समोरील वही उघडी करून टेबलवर ठेवून "चल देवून टाक, चल ठेव" असे म्हणून लाचेची मागणी करून त्यंानी रक्कम वहीमध्ये ठेवण्यास सांगीतली. त्याप्रमाणे मी माझ्या पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवलेली 1000/- रूपये लाच रक्कम माझ्या उजवे हाताने बाहेर काढून तमायचे यांचे समोर धरली असता त्यांनी वहीमध्ये ठेवण्यास सांगीतली. त्याप्रमाणे मी वहीमध्ये 1000/- रूपये ठेवले. त्यानंतर मी बाजीराव पाटील साहेबांच्या कक्ष समोर गेलो असता पाटील साहेब त्यांच्या कक्षामध्ये नव्हते. तमायचे यांनी माझ्याकडून लाच रक्कम स्विकारली असल्याने मी माझ्या तोंडावरील रूमाल बाजूला काढून लाच स्विकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच घाटगे साहेब, पंच कांबळे व पथक

Scanned with CamScanner

असे मी व पंच बलबंड थांबलो त्या ठिकाणी कार्यालयात आले. घाटगे साहेब यांनी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यावेळी पंच बलबंड यांनी तमायचे महसूल शाखेत असल्याचे सांगून त्यांनी लाच स्विकारली असल्याचे सांगीतले. घाटगे साहेब यांनी मला बाहेरच थांबण्याबाबत सांगून घाटगे साहेब,दोन्ही पंच व पथक महसूल शाखेत गेले. थोडयावेळाने घाटगे साहेब यांनी मला महसूल शाखामध्ये बोलवून घेतले. अंधार करुन माझे हात व कपडे तपासण्यात आले. त्यावेळी माझे उजवे हाताचे बोटावर व पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशाचे तोंडास व आतील बाजुस अॅ.पा.ची चकाकी दिसून आली. त्यानंतर घाटगे साहेब यांनी मला बाहेर जावुन थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी तेथून बाहेर जावुन थांबलो. काही वेळानंतर घाटगे साहेबांकडून पाटील नायब तहसिलदार यांना ताब्यात घेतल्याची हकिगत समजली. त्यानंतर घाटगे साहेब यांनी मला अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालय या ठिकाणी येण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी आष्टा येथून निघून माझ्याकडील मोटरसायकलीवरून एसीबी कार्यालय सांगली या ठिकाणी दाखल झालो. काही वेळानंतर घाटगे साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे पाटील नायब तहसिलदार व तमायचे लिपीक यांना सोबत घेवून त्या ठिकाणी आले. त्यावेळी घाटगे साहेब यांनी मला बाहेर थांबण्याबाबत सांगीतले. त्याप्रमाणे मी बाहेर थांबलो. घाटगे साहेबांनी त्यांची पुढील कारवाई सुरु ठेवली. त्यानंतर थोडयावेळाने घाटगे साहेबांनी मला बाहेरुन कार्यालयातील त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले. त्यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली, त्यानंतर मला कार्यालयाच्या बाहेर जावून थांबण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी बाहेर जावून थांबलो. त्यानंतर पुन्हा थोडया वेळाने घाटगे साहेब यांनी मला कार्यालयात बोलावुन घेवुन सापळयाची हकीकत विचारली. त्यावेळी मी त्यांना सापळयाची सविस्तर हकीकत सांगीतली. घाटगे साहेबांनी घडले घटनेचा सविस्तर पंचनामा केला. सदर कारवाई दरम्यान नायब तहसिलदार पाटील व तमायचे यांचे पुर्ण नाव बाजीराव राजाराम पाटील, नायब तहसिलदार, व सुधीर दिपक तमायचे महसुल सहाय्यक, अपर तहसिलदार कार्यालय आष्टा ता.वाळवा जि.सांगली असे असल्याचे मला समजले आहे.

माझ्या वडीलार्जीत जमीनीच्या सातबारा उतारावर राजपत्राप्रमाणे नावामध्ये बदल करून देण्याचे कामामध्ये नायब तहसिलदार पाटील यांनी माझा प्रकरणावर सही करण्यासाठी व तमायचे महसुल सहाय्यक यांनी सदरचे प्रकरण तहसिलदार मॅडम यांचेकडे पाठवण्यासाठी 1000/- रूपये लाचेची मागणी केली असून तमायचे महसुल सहाय्यक यांनी सदर 1000/- रूपये रक्कम मला त्यांचे जवळील वहीमध्ये ठेवण्यास सांगून 1000/- रूपये लाच रक्कम माझ्याकडून स्विकारली आहे. म्हणून माझी त्या दोघांविरूध्द फिर्याद आहे.

Scanned with CamScanner

माझा मराठी मध्ये टाईप केलेला वर्दी जबाब मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेला आहे.

समक्ष

हा दिला वर्दीजबाब,

पोलीस स्टेशन ऑफीसर
आष्टा पोलीस स्टेशन

Scanned with CamScanner